वृत्तान्त

# मराठी शाळा गुढिपाडवा कार्यक्रम.

इथे म्हणजे अमेरिकेत जन्मलेल्या मराठी मुलांची मराठी भाषा चांगली व्हावी, त्यांना या भाषेच्या अनेक वेगवेगळ्या अंगांची जाणीव व्हावी, त्यातलं सौंदर्य त्यांच्यापर्यंत पोचावं म्हणून चालवली जाणारी 'मराठी शाळा' हा फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळाचा एक अभिनव असा उपक्रम.

२००५ सालच्या दसऱ्याला या शाळेची सुरुवात झाली आणि तेव्हापासून ही शाळा महिन्यातून चार वेळा अशी चालवली जाते. इथल्याच काही मुलांचे पालक अगदी मनापासून आणि आनंदाने शिक्षकांची भूमिका निभावतात. मातृदेवो भव। पितृदेवो भव। आणि आचार्यदेवो भव। या आपल्या संस्कृतीतील वचनांचा इथे खऱ्या अर्थाने प्रत्यय येतो.

या शाळेचा गुढिपाडव्याचा कार्यक्रम रविवार २ एप्रिल रोजी सकाळी श्री व सौ उपाध्ये यांच्या घरी साजरा करण्यात आला. सर्वप्रथम मराठी नववर्षाचं आणि कुठल्याही क्षेत्रातल्या विजयाचं प्रतिक असलेली गुढी उभारण्यात आली. आजच्या दिवसाचं स्वरुप हे नेहमीच्या शाळेपेक्षा थोडं वेगळं होतं. गेल्या ५-६ महिन्यात शाळेत शिकण्यामुळे मुलांना काय मिळालं हे कळण्यासाठी 'विविध गुणदर्शन' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुलांनी आणि मुलांच्या पालकांनी गाणं, गोष्ट, कविता, पाडव्याची माहिती, श्लोक असं काहिही किंवा अगदी विनोद सांगितला तरी चालेल पण तो मराठीतच हवा असा कार्यक्रमाचा नियम होता. त्याप्रमाणे कुणी विनोद सांगितला तर कुणी गुढिपाडव्याची माहिती, कुणी कविता वाचून दाखवल्या तर काही अगदी लहान मुलांनी गणपतीस्तोत्र, शुभंकरोति हे स्वच्छ उच्चारांसह तोंडपाठ म्हणून दाखवून सगळ्यांनाच तोंडात आश्चर्याने बोटे घालायला लावली. दोघीजणींनी अतिशय सुरेल आवाजात गाणी सादर केली.

त्यानंतर एक छोटंसं कापड, छोटा गडू, काठी आणि फुलं यांच्या सहाय्याने मुलांनी आपल्या हाताने छोट्याछोट्या गुढ्या तयार केल्या. स्वतः हाताने तयार केलेली गुढी बघणं ही खूपच आनंददायी गोष्ट होती.

शाळेच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे शारदास्तवनाने सुरू झालेल्या कार्यक्रमाचा शेवट 'गणपती बुद्धि दे....' या प्रार्थनेने करण्यात आला. व त्यानंतर भोजनाचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाच्या आठवणी मनात जागवत सर्वांनी आपापल्या घराची वाट धरली.